


# साप्ताहिक किंमत सनियंत्रण अहवाल

## ०७.१०.२०२४

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)


The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)


**१. मका** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


## मका साप्ताहिक किंमती

## दि. ०६ ऑक्टोबर २०२४ अखेर : ₹ २२३३ /क्विंटल







- मागील आठवड्यात नांदगाव बाजारात मक्याची किंमत रु. २२३३ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये वाढ झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत मक्याच्या आवकमध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे १२२.१२ % व १६१ % इतकी वाढ झाली आहे.
- खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. २२२५ प्रती क्विंटल आहे.
- सध्या मक्याच्या किंमती MSP पेक्षा जास्त आहेत.


**Source : Agmarknet**


**२. हरभरा** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# हरभऱ्याच्या साप्ताहिक किंमती

## दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर: रु. ७०००/क्विंटल




**गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी हरभरा उत्पादन कमी राहण्याची शक्यता आहे**


**सध्याच्या किमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.**


**रबी हंगाम २०२३-२४ साठी किमान आधारभूत किंमत रु. ५४४० प्रति क्विं. आहे**


## ३. तूर (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# तुरीच्या साप्ताहिक किंमती

### दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर: रु. ९८३३/क्विंटल




**गेल्या वर्षीच्या तुलनेत तूर उत्पादन यावर्षी सारखेच राहण्याची शक्यता आहे.**

**सध्याच्या किमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा जास्त आहेत.**


**खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७५५० प्रति क्विं. आहे**


## ४. सोयाबीन (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


**सोयाबीन साप्ताहिक किंमती**

**दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर : रु. ४५०० प्रती क्विंटल**






- मागील आठवड्यात लातूर बाजारात सोयाबीनची सरासरी किंमत रु. ४५०० प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत ३.६% घट झाली आहे.

- सोयाबीनची खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु.४८९२ प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे. सध्या लातूर बाजारात सोयाबीनच्या किंमती या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत.

–मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबींनची आवकमध्ये राष्ट्रीय पातळीवर २३ टक्केनी वाढ झाली आहे.


- मागील आठवड्यात प्रमुख बाजारपैकी लातूर बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु.४५००/क्विंटल.) तर वाशीम बाजारात सरासरी किंमती रु. ४३६१/क्वि. होत्या.


Source: Agmarknet


५. **कापूस** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

## कापसाच्या साप्ताहिक किंमती
## दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर : रु. ७,६५८/- क्विंटल






२०२४-२५ साठी जागतिक कापूस ताळेबंदात, उत्पादन, उपभोग, व्यापार आणि प्रारंभ आणि समाप्ती साठा सर्व कमी केले आहेत. चीनमधील मोठ्या पिकाची भरपाई करण्यापेक्षा युनायटेड स्टेट्स, भारत आणि पाकिस्तानमधील लहान पिके म्हणून जागतिक उत्पादन सुमारे १.२ दशलक्ष गाठी कमी झाले आहे. व्हिएतनाममध्ये २,००,००० गाठी कमी झाल्यामुळे आणि बांगलादेश आणि तुर्कीमध्ये १००,००० गाठी कमी झाल्यामुळे जागतिक वापर सुमारे ४,६०,००० गाठी कमी झाला आहे. चीन, व्हिएतनाम, तुर्की आणि बांगलादेश यांनी आयात कमी केल्याने भारतातील वाढीची भरपाई झाल्यामुळे जागतिक व्यापार सुमारे ५५०,००० गाठी कमी झाला आहे. जागतिक स्तरावरील शेअर्स ऑगस्टपासून १.१ दशलक्ष गाठी कमी होऊन सुमारे ७६.५ दशलक्ष झाले आहेत.


वाढता खप आणि निर्यातीमध्ये विक्रमी कमी साठा असलेल्या भारताच्या कापूस क्षेत्राला गंभीर स्थितीचा सामना करावा लागत आहे. उत्पादन अंदाजांमधील विसंगती आधीच आव्हानात्मक आहे, जागतिक बाजारपेठेत पुरवठा स्थिरता आणि स्पर्धात्मकता सुनिश्चित करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता आहे.


## ६. कांदा (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# कांदाच्या साप्ताहिक किमती

दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर: रु. ४२४४/ क्विंटल






-कांद्याची लासलगाव बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. ४२४४ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतींत ७ टक्केनी घट झाली आहे.

-देशपातळीवरव राज्यात कांद्याच्या आवकमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत २८ % नी घट झाली आहे.

-मागील आठवड्यात पिंपळगाव बाजारात कांद्याच्या किंमती ( रु. ४३६०/क्वि.) सर्वाधिक होत्या, तर सोलापूर बाजारात कांद्याच्या किंमती रु.२८८३ /क्वि. इतक्या होत्या.


0


७. **टोमॅटो** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → [https://rb.gy/hzx5xl](https://rb.gy/hzx5xl))


# टोमॅटो साप्ताहिक किंमती

दि. ६ ऑक्टोबर २०२४ अखेर : रु. ३२४२/क्विंटल






- टोमॅटोच्या पुणे बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु.३२४२ प्रती क्विंटल होत्या. किंमतीत मागील आठवड्याच्या तुलनेत ४४% नी वाढ झाली आहे.

- देशपातळीवर मागील आठवड्याच्या तुलनेत टोमॅटोच्या आवक मध्ये ४.७ टक्केनी घट झाली आहे.

- प्रमुख APMC बाजारापैकी मुंबई बाजारात सर्वाधिक किंमती ( रु.४८६०/क्विं.) होत्या तर सोलापूर बाजारात सर्वात कमी किंमती ( रु. २३८०/ क्विं.) होत्या


Source: Agmarknet


८. **हळद** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


## हळदीच्या साप्ताहिक किंमती

## दि. ०६ ऑक्टोबर २०२४ अखेर : ₹ . १२,६०१ / क्विंटल






Source - Agmarknet

- मागील आठवड्यात सांगली बाजारात हळदीची किंमत रु. १२६०१ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये घट झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत हळदीच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर घट झाली आहे.
- २०२४ ते २०३१ या अंदाज कालावधीत जागतिक हळदीची बाजारपेठ लक्षणीय दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
- २०२१ मध्ये जागतिक हळदीच्या बाजारपेठेचे मूल्य १०८१.३४ दशलक्ष डॉलर्स होते आणि अंदाज कालावधीत ७.१९% च्या सीएजीआरने विस्तार होण्याची अपेक्षा आहे, जी २०३१ पर्यंत १६४०.१३ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचेल.
- हळदीचे जागतिक उत्पादन दरवर्षी सुमारे ११ लाख टन आहे. जागतिक उत्पादन क्षेत्रात भारताचे ८०% योगदान आहे, त्यानंतर चीन (८%), म्यानमार (४%), नायजेरिया (३%) आणि बांगलादेश (३%) यांचा क्रमांक लागतो.
- सन २०२२-२३ मध्ये हळदीचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये महाराष्ट्र राज्य भारतामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. पिकाचे लागवडीखालील क्षेत्र सुमारे ८८३०० हेक्टर असून त्याचे उत्पादन ३२३२०० टन इतके होते.
- महाराष्ट्रात सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम हे हळदीची लागवड करणारे प्रमुख जिल्हे आहेत.

(स्रोत – हळद आउटलुक – अहवाल)

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

पुढील QR कोड स्कॅन करून स्मार्ट प्रकल्पाचे मोबाईल ॲप्लिकेशन डाउनलोड करा

---

अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष


प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,
सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

**फोन** : ०२०-२५६५६५७७, **टोल फ्री क्रमांक**: १८०० २१० १७७०,
**ई-मेल** : market.intelligence.smart@gmail.com
**वेबसाईट** : smart-mh.org